# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषयः- महाराष्ट्र विधानपरिषदेची पदवीधर व शिक्षक मतदार संघ
द्विवार्षिक निवडणूक २०२०.....
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्याबाबत.

संदर्भः- उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून आलेले दि.२६/११/२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दि.०२/११/२०२० च्या प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या औरंगाबाद विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग या पदवीधर व अमरावती विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२० चा कार्यक्रम घोषित केलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत **मंगळवार दि.०१ डिसेंबर, २०२० रोजी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत** मतदार होणार आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३/०६/२०११ च्या शासन निर्णयानुसार, या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/शिक्षक मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा देणे आवश्यक आहे.

त्यानुसार, या निवडणूकीच्या मतदारांना मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्यात येत आहे. सदरची रजा ही कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजेव्यतिरिक्त असणार आहे. तसेच सदरचा रजा अर्ज हा मा.विभागप्रमुखांमार्फत आस्थापना विभागास अग्रेषित करण्यात यावा. सदर निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 1929

दिनांक : 27 NOV 2020

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
५. मा.कुलगुरु, मा.कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांच्या कार्यालयास माहितीसाठी.
६. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)

**टीपः- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**